राष्ट्रीय वृध्दापकाळ शुश्रृषा कार्याक्रमांतर्गत
ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व
सर ज.जी.समुह रुग्णालये यांना
रिजनल जेरीअ‍ॅट्रीक सेंटरसाठी
केंद्र शासनाने मंजूर केलेले अनुदान
वितरीत करण्यास मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण २०१७/ प्रक्र-८/आरोग्य ३(अ)
गो.ते.रुग्णालय संकुंल इमारत, १० वा मजला, ए विंग
मंत्रालय, एल.टी.मार्ग, मुंबई- ४०० ००१.
दिनांक: ०४ जानेवारी, २०१८.

वाचा :-

१) आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय,नवी दिल्ली यांचे क्र.T-२२०११/०१/२०१६-NCD(i) दि.२५ फेब्रुवारी,२०१६ चे पत्र.

२) शासन परिपत्रक,वित्त विभाग क्रमांक,अर्थसं-२०१७/प्र.क्र.८९/अर्थ-३,दि.८ फेब्रुवारी,२०१७.

शासन निर्णय:-

सन २०१५-१६ या वित्तीय वर्षात राष्ट्रीय वृध्दापकाळ शुश्रृषा कार्याक्रमांतर्गत ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर ज.जी.समुह रुग्णालये यांना रिजनल जेरिअ‍ॅट्रीक सेंटर करीता केंद्र शासनाने दि.२५.०२.२०१६ च्या पत्रान्वये मंजूर केलेले रु.५० लाख इतके अनुदान वितरीत करण्यास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे

२. शासन परिपत्रक,वित्त विभाग क्रमांक, अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३,दि.१८ एप्रिल, २०१७ अन्वये सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता केंद्र पुरस्कृत योजनांसाठी निधी वितरणाची मर्यादा १०० % इतकी आहे. सदर मंजूर निधी नियंत्रक अधिकारी म्हणून अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (असंसर्गजन्य रोग), मुंबई यांच्याकडे खालील लेखाशीर्षामध्ये वितरीत करण्यात येईल.

मागणी क्र.आर-१,
२२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य
३१ सहायक अनुदाने (वेतनेतर)
(०१)(३३) राष्ट्रीय वृध्दापकाळ आरोग्य शुश्रुषा कार्यक्रम,
केंद्र हिस्सा (२२१०एफ३०८)

३. " सदर अनुदानासाठी प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा आयुक्तालय,मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सदर रकमेचे देयक त्यांनी कोषागारात सादर करुन विहीत केलेल्या बाबींवर खर्च करण्यासाठी सदर रक्कम संबंधित कार्यक्रम अधिका-यांकडे सुपुर्द करावी."

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.४१२/अर्थ-९११७/दि.२१.११.२०१७ अन्वये प्राप्त सहमतीस अनुसरुन तसेच वित्त विभाग क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम भाग-२, दि.१७.४.२०१५

सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उपविभाग-तीन मधील अ.क्र.४,नियम क्र.२७(२) अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्रमांक २०१८०१०४१७१५१३३११७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shamraoji Kaurte

Digitally signed by Rajendra Shamraoji Kaurte
DN: CN = Rajendra Shamraoji Kaurte, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2018.01.04 18:02:40 +05'30'

(रा.शा.कौरते)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२(लेखा अनुज्ञेयता / लेखा परिक्षा) मुंबई/ नागपूर.
२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई .
३. निवासी लेखा परिक्षा अधिकारी , मुंबई.
४. आयुक्त (कु.क.) तथा संचालक, रा. आ. अ, आरोग्य भवन, मुंबई.
५. प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग
६. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
७. सहसंचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
८. सहसंचालक (असंक), आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
९. वित्त विभाग (व्यय -१३ / अर्थसंकल्प-९), मंत्रालय, मुंबई
१०. अधिष्ठाता, सर जे जे समूह रुग्णालये, मुंबई
११. सार्वजनिक आरोग्य विभाग (अर्थसंकल्प/ लेखा), मंत्रालय, मुंबई.
१२. निवडनस्ती, आ-३अ